**मं.कौं.हि.सं. अर्ज क्र.१५/२०२४**

**मधुनलिनी रोहित कदम**
**विरुध्द**
**रोहित भास्कर कदम व इतर**

## निशाणी क्र. १३ वरील आदेश.

अर्जदार हिने सदरचा अर्ज हा महिलांचा कौटुंबीक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम कलम २३ प्रमाणे अंतरीम पोटगी मिळणेकरिता दाखल केला आहे.

अर्जदारचे थोडक्यात कथन-

२. अर्जदार व वि.प.क्र. १ यांचा विवाह दिनांक २२.१२.२०१९ रोजी बसव मंडप, वाळवा, ता. वाळवा, जि.सांगली येथे हिंदु धर्म शास्त्राप्रमाणे झाला. वि.प.क्र. १ हा अर्जदार हिचा नवरा असून वि.प.क्र. २ ते ४ हे अर्जदाराचे सासु-सासरे व नणंद आहेत. लग्नानंतर अर्जदार ही तिचे सासरी वि.प. यांचे सोबत नांदायला गेली. लग्नानंतर साधारणपणे तीन वर्षे अर्जदार व वि.प. यांचा संसार व्यवस्थीत चालू होता . परंतू त्यानंतर अर्जदाराला मुल झाले नसल्याने गेले आदमासे वर्षापासून अर्जदाराचे पती, सासु व सासरे यांनी अर्जदार हिला त्रास देण्यास सुरुवात केली. वि.प. हे अर्जदार हिला ' तुला मुल होत नाही, तु वांझोटी आहेस ' असे टोचून बोलून अर्जदार हिला मानसिक त्रास देत होते. अर्जदार हिला मुल होत नाही या कारणावरुन वि.प.हे तिला घरातील ज्यादा काम करायला सांगून कामात चुका काढणे, शिवीगाळ करणे, मारहाण करणे, घरामध्ये खाण्यापिण्याचे साहित्य न आणणे अर्जदारला उपाशी ठेवणे असे प्रकार करत होते. अर्जदाराने वि.प. यांच्याकडे मुल होण्यासाठी उपचार व तपासणी करण्याची मागणी केली परंतू वि.प. यांनी अर्जदार हिच्यावर उपचार केले नाहीत याउलट वि.प. हे अर्जदार हिला " तुझ्या माहेरची शेती विकून पैसे आण मग उपचार करु व फ्लॅट घेवू " असे म्हणत होते. वि.प. हे अर्जदार हिला वेळोवेळी अपमानीत करुन त्रास देत होते. त्यानंतर अर्जदार हिने काही दिवसांनी घडलेला सर्व प्रकार हा तिच्या घरच्या लोकांना सांगीतला त्यावेळी अर्जदार हिच्या माहेरचे नातलग हे वाळवा येथे आले व त्यांच्यामध्ये आणि वि.प.यांच्यामध्ये बैठक झाली त्यावेळी वि.प. यांनी अर्जदार हिला पुन्हा त्रास देणार नाही असे सांगीतले होते. परंतू वि.प. यांच्या

वागण्यामध्ये कोणतीही सुधारणा झाली नाही.

३. दि. ०२.०२.२०२४ रोजी सायंकाळी ०६.०० वाजताच्या सुमारास अर्जदार हिचे पती घरी आले त्यावेळी अर्जदार ही टि.व्ही.पाहत बसली होती. अर्जदाराचे पतीने " तु केबलचा रिचार्ज का केलास, तुझा काय संबंध रिचार्ज मारायचा, इथे राहायचे नाही, तुझा इथे काही संबंध नाही, तु तुझ्या आईचे घरी निघुन जा " असे म्हणत भांडण सुरु केले. त्यानंतर वि.प. यांने परत तिला शिवीगाळ करुन टि.व्ही.चा सेटऑप बॉक्स फोडून अर्जदार हिला लाथाबुक्यांनी मारहाण करुन तिच्या मानेला धरुन भिंतीवर डोक्यावर आपटले व तिला " घरातून निघून जा नाहितर तुला जिवंत ठेवणार नाही " असे म्हणून घराबाहेर काढले. त्यामुळे अर्जदार हिने तिचे मामा राजाराम शंकर डांगे यांना फोन करुन बोलवून घेतले. त्यांच्यासोबत अर्जदार ही आपटी ता.पन्हाळा येथे तिचे माहेरी आली. त्यानंतर दि. ०७.०२.२०२४ रोजी अर्जदार हिने वि.प.विरुध्द भारतीय दंड संहिता ४९८-अ नुसार पन्हाळा पोलीसठाणे येथे फिर्याद दाखल केली. दि.०२.०२.२०२४ पासून आजअखेर पर्यंत वि.प.क्र.१ यांनी अर्जदाराचे औषध पाणी, कपडालत्ता आणि दैनंदिन खर्च भागविणेसाठी कोणतीही मदत अगर विचारपुस केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हिने वि.प.क्र. १ यांच्याकडून अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रति महिना रक्कम रुपये १५,०००/- इतकी पोटगी मिळण्याकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला.

४. वि.प.हे न्यायालयात हजर राहिले व त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे निशाणी क्र. १५ कडे दाखल केले. वि.प. यांनी अर्जदार सोबत असलेले नातेसंबंध मान्य करुन इतर मजकूर हा नाकबुल केला. वि.प. यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार हिच्या आई वडीलांनी त्यांच्या लग्नामध्ये कोणताही खर्च केलेला नव्हता व नाही. याउलट वि.प. यांनी लग्नाचा सर्व खर्च करुन अर्जदार हिच्या माहेरच्या सर्व नातेवाईकांचा योग्य व चांगल्या प्रकारे मानपान केलेला आहे. अर्जदारही कधीही वि.प.क्र. २ ते ४ यांच्या सोबत कायम स्वरुपी राहिलेली नव्हती व नाही. अर्जदार हिच्या वडीलांचे निधन झाले असल्याने अर्जदार ही तिच्या आईसोबत राहत होती. अर्जदार हिचे आई व मामा यांनी सुरुवातीलाच " आम्ही फक्त नारळ मुलगी देणार, कोणत्याही प्रकारे खर्च करणार नाही " असे वि.प. यांना सांगितले होते. विवाहानंतर अर्जदार ही वि.प. यांच्या कोल्हापूर येथील घरी नांदावयास आली त्यावेळेस घरामध्ये अर्जदार व वि.प.क्र. १ हे दोघेच राहत होती. वि.प.क्र.२ व ३ हे कधी कधी कोल्हापूर

येथे येत जात होते. विवाहानंतर थोडेच दिवस अर्जदार ही वि.प. यांच्या बरोबर व्यवस्थीत राहिली त्यानंतर अर्जदार ही विनाकारण वि.प. क्र. १ यांना वाईट शिवीगाळ करुन त्यांच्याशी भांडण काढत होती. अर्जदार ही नेहमी मोबईलवर कोणाशी तरी चॅटींग करत होती व सतत रुममध्ये मोबाईल बघत बसत होती. वि.प. यांनी अर्जदार हिला बाहेर बोलवले असता ती रुमच्या बाहेर येत नव्हती. ती रुमच्या बाहेर येताना मोबाईल मधील कॉल व मॅसेजही डिलीट करत होती. वि. प. यांनी अर्जदार हिला कोणाशी बोलतेस असे विचारले असता ती वि.प. यांना उडवा उडवीची उत्तर देत होती. वि.प.क्र.१ याचे अर्जदार हिचेवर खुप प्रेम असल्याने वि.प. हे अर्जदाराची समजुत काढत होते परंतू अर्जदार ही वि.प. यांचे काही ऐकत नव्हती. अर्जदार ही हट्टी व हेकेखोर स्वभावाची असल्यामुळे घरामध्ये कोणत्याही प्रकारचे काम करत नव्हती. अर्जदार ही वारंवार वि. प. यांना बाहेरुन जेवणाचे पार्सल आणण्यास सांगत होती.

५. अर्जदार ही वारंवार माहेरी निघून जात होती आणि प्रत्येक वेळेस वि.प. हे अर्जदार हिला नांदावयास घेवून येत होते. अर्जदार ही वि.प. यांच्याकडे माहेरच्या घर खर्चाकरिता पैशाची मागणी करीत होती. त्यानुसार वि.प. यांनी अर्जदार हिला तिचे माहेरचे घर खर्चाकरिता ब-याच वेळेस रोख रक्कम स्वरुपात रक्कम दिलेली आहे. अर्जदार ही नेहमी वि.प. यांच्यासोबत भांडण काढून तिचे माहेरी जात होती. अर्जदार ही वि.प.याला वि.प. यांच्यामध्ये दोष असल्यामुळे " मला मुल होत नाही, मी तुमच्यासोबत लग्न करुन चुक केली, मी दुस-यासोबत लग्न केले असते तर मला मुल झाले असते " असे बोलून वि.प. यांचा अपमान करत होती. वि.प. यांनी अर्जदार हिच्यावर ब-याच हॉस्पीटलमध्ये उपचार घेतलेले आहेत. वि. प. यांनी अर्जदार हिला टेलरिंगचा व इंटिमेट ज्वेलरीचा क्लास देखील लावला होता.

६. वि.प. क्र. १ याने अर्जदार हिला कधीही कोणत्याही प्रकारे मारहाण अगर शिवीगाळ केली नव्हती. याउलट दि. ०२.०२.२०२४ रोजी सायंकाळी वि.प.क्र. १ हा घरी आल्यानंतर विनाकारण अर्जदार हिने वि.प.याच्यासोबत वाद घालून तिला माहेरी राहायचे आहे असे सांगीतले. वि.प.यास अर्जदार हिची काळजी असल्यामुळे वि.प.यांनी कोणाला तरी बोलवून घेवून माहेरी जाण्यास सांगितले व वि.प. हा त्याच्या कामानिमित्त घरातून बाहेर निघून गेला. त्यावेळी अर्जदार हिने तिचा मामा, मावस भाऊ व त्यांचे दोन मित्र यांना बोलावून घेतले आणि अर्जदार हिने तिचे सर्व कपडे साहित्य, दागिने, वि.प.क्र.२ हिचे सोन्याचे दागिने व साडी असे सगळे साहित्य बॅगेमध्ये

भरुन अर्जदार हि कायम स्वरुपी वि.प.यास सोडून जाण्याच्या इराद्याने घरातून बाहेर निघून गेली. त्यानंतर अर्जदार ही वि.प.यांच्याकडे नांदावयास आलेली नाही. अर्जदार हिने वि.प.क्र. २ यांच्या तिजोरी मधील साहित्य चोरुन नेल्याची बाब वि.प.क्र. २ याला समजल्यानंतर तिने दि. १३.०२.२०२४ रोजी अर्जदार हिचे विरुध्द शाहुपरी पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली. वि.प. यांनी ब-याच वेळा स्वतः अर्जदार हिच्या माहेरी जावून तिला नांदायला नेण्याकरिता विनंती केली असता अर्जदार हिने वि.प. यास मी नांदावयास येणार नाही मला घटस्फोट पाहिजे असे स्पष्ट शब्दात सांगितले. त्यानंतर वि.प. याने मध्यस्था मार्फत अर्जदार हिने नांदावयास यावे याकरिता प्रयत्न केला असता व अर्जदार हिचे मामा यांचेशी घरी जावून संपर्क साधला असता त्यांनी वि.प. यांना वाईट शब्दात शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. अर्जदार हिने वि.प. यांना कधीही वैवाहिक सुख दिलेले नाही. वि.प. यांनी अर्जदार हिच्या सर्व गरजा, कपडा-लत्ता, औषधपाणी इ.सर्व वेळचे वेळी पुर्ण केलेले आहे. अर्जदार हिने वि.प. यास " मी नांदावयास येणार नाही " असे सांगितले तसेच अर्जदार व तिच्या आईने " पन्नास लाख रुपये द्या आणि घटस्फोट घ्या नाहीतर तुमच्या घरातील सर्वांविरुध्द पोलीसतक्रारी करु " अशी धमकी दिली होती.

७. वि.प.हा खाजगी नोकरी करत असून त्याला दरमहा रक्कम रुपये २०,०००/- इतका पगार मिळतो. अर्जदार हिचे हट्ट पुरविणेकरता व तिच्यावर उपचार करण्याकरिता वि.प. यास हातऊसने रक्कम रुपये दोन लाख घ्यावी लागली होती व त्याची अद्याप परतफेड झालेली नाही. वि.प. याला त्याचे स्वतःचे, त्याचे आईवडीलांचे औषध कपडलेलत्ता याकरिता बराच खर्च होतो. वि.प. यांचे नांवे कोणतेही प्रकारे शेतमिळकत अगर घर मिळकत नाही.वि.प.याचे कोल्हापूर येथील घर सुध्दा वि.प.क्र. ३ चे स्वकष्टार्जित घर आहे. त्यामध्ये वि.प.क्र. १ यांचा कोणताही हक्क नाही. त्यामुळे वि.प. यांची अर्जदार हिला पोटगी देण्याकरिता आर्थिक परिस्थीती/कुवत नाही. याउलट अर्जदार हिचे चांगले शिक्षण झालेले असून तिचा टेलरिंगचा व इंटिमेट ज्वेलरीचा क्लास झालेला आहे. अर्जदार हिचे माहेरी टेलरिंगचे व इंटिमेट ज्वेलरीचे काम करत असून त्यामधून तिला दरमहा पंधरा हजार रुपये इतके उत्पन्न मिळते. अर्जदार हिच्या आईचे स्वतःचे घर व वाडवडिलार्जित शेतमिळकत आहे. त्यातुन त्यांना वार्षीक चार ते पाच लाख रुपये इतके उत्पन्न मिळते. अशाप्रकारे अर्जदार हिची व तिच्या माहेरची परिस्थिती चांगली आहे. अर्जदार ही स्वतः कमावती असल्याने ती तिचे

स्वतःचे पालन पोषण औषध उपचार इ.सर्व स्वतः करु शकते. त्याकरिता तिला वि.प. यांच्यावर अवलंबून राहण्याची गरज व आवश्यकता नाही. अर्जदार हिने स्वतःहून वि.प. यांचा त्याग केला आहे. त्यामुळे वि.प. यांच्या कडून अर्जदार हिला पोटगी मागण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही त्यामुळे सदरचा अर्ज हा नामंजूर करण्यात यावा.

८. अर्जदारातर्फे विधीज्ञ अॅड. आर. आर. तोरसे आणि वि.प. तर्फे विधीज्ञ अॅड.एल. बी. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाच्या निकालासाठी माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले. त्याचे उत्तर कारणांसहीत पुढीलप्रमाणे सांगता येईल.

| **अ.नं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार ही अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | **... अंशतः होकारार्थी. दरमहा रक्कम रुपये ३,५००/-फक्त** |
| २ | अंतिम आदेश काय ? | **... अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

९. प्रस्तुत अर्जाकामी अर्जदार हिने वि.प. यांच्याविरुध्द पन्हाळा पोलीस ठाणे येथे दाखल केलेली भारतीय दंड संहिता कलम ४९८-अ अन्वयेची प्रथम खबर अहवालाची प्रत, कसबा बावडा कोल्हापूर येथे वि.प. यांचे नांवे असणारा फ्लॅट सि.स.नं.११५३ चे मालमत्ता पत्रक, सदर मिळकती संदर्भात वि.प. यांचे नावे असलेला असेसमेंट उतारा व अर्जदार हिचे मालमत्ता व दायित्व प्रमाणपत्र इ. कागदपत्र दाखल केले आहेत. प्रस्तुत अर्जाकामी वि.प.क्र. १ यांचे मालमत्ता व दायित्व प्रमाणपत्र हे दाखल करण्यात आले आहे.

**<u>मुद्दा क्रमांक १ व २ करीता</u>** -

१०. अर्जदार यांचा अर्ज, वि.प.यांचे प्रतिकथन, उभय पक्षांनी दाखल केलेली कागदपत्रे यांचे अवलोकन केले असता अर्जदार व वि.प.क्र. १ यांचे पति-पत्नीचे नाते आजपर्यंत कायम आहे ही बाब उभय पक्षांना मान्य असलेची दिसून येते.

वि.प. याने अर्जदार ही स्वतःहून वि.प. याचे घर सोडून गेल्याचे कथन केले याउलट अर्जदार हिने वि.प. याने केलेल्या कृत्यामुळे ती तिच्या माहेरी राहत असून वि.प. यांनी तिला घराबाहेर काढले असे कथन केले परंतू ती बाब अर्जाकामी उभयपक्षांचा पुरावा अभिलेखावर दाखल झाल्यानंतर स्पष्ट होणार आहे. परंतू अर्जदार ही दि. ०२.०२.२०२४ पासून ती तिच्या माहेरी रहात असल्याचे दिसून येते. वि.प.क्र.१ याने त्याच्या म्हणण्यामध्ये व त्याने दाखल केलेल्या मालमत्ता व दायित्व प्रमाणपत्रामध्ये वि.प. हा खाजगी नोकरी करीत असून त्याला दरमहा रक्कम रुपये वीस हजार इतका पगार मिळतो ही बाब मान्य केलेली आहे.

११. अर्जदार ही दि.०२.०२.२०२४ पासून तिचे माहेरी राहत आहे. अर्जदार हिने दरम्यानचे काळात वि.प.क्र. १ यांने अर्जदार हिला नांदवायचा कोणताही प्रयत्न केला नाही असे कथन केले. याउलट वि.प.क्र १ याने त्या दरम्यानच्या काळात त्याने ब-याच वेळा अर्जदार हिला नांदवायचा प्रयत्न केला असे कथन केले. परंतू अर्जदार व वि.प. क्र. १ यांच्या कथनाबाबत कोणताही पुरावा हा अभिलेखावर आलेला नाही. अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन नाही ही बाब तिने अर्जामध्ये कथन केलेली आहे व त्याबाबत तिने तिचे मालमत्ता व दायित्व प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. याउलट वि.प.क्र.१ हा खाजगी नोकरीला असलेचे अर्जदाराने कथन केले व ती बाब वि.प. याने नाकबुल केलेली नाही. त्यामुळे वि.प.क्र.१ याला उत्पन्नाचे पुरेशे साधन असल्याचे दिसून येते.

१२. वि.प.क्र. १ याने अर्जदार हिने टेलिरिंगचा आणि इंटिमेट ज्वेलरीचा व्यवसाय करीत असून तिला दरमहा पंधरा हजार रुपये इतके उत्पन्न मिळते असे कथन केले. परंतू त्या संदर्भात वि.प.क्र. १ याने कोणताही पुरावा हा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच अर्जदार हिने तिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही ही बाब मान्य केलेली आहे.

१३. मी वर उल्लेख केल्याप्रमाणे अर्जदार हिला उत्पन्नाचे पुरेशे साधन नाही. अर्जदार ही दि. ०२.०२.२०२४ पासून तिचे माहेरी राहते. दि.०२.०२.२०२४ पासून अर्जदाराच्या पालन पोषणाची जबाबदारी वि.प.नं.१ याने पार पाडली अथवा त्यासाठी काही मदत केली असे वि.प. याने केलेल्या कथना संदर्भात कोणताही पुरावा वि.प.क्र.१ याने अभिलेखावर दाखल केलेला नाही. प्रस्तुत अर्ज दाखल झालेनंतर

त्याची अंतिम सुनावणी होण्यासाठी बराच कालावधी जाण्याची शक्यता आहे. या दरम्यानच्या काळात अर्जदाराच्या पालन पोषणासाठी तिला अंतरिम पोटगी मंजूर करणे योग्य व संयुक्तीक होईल.

१४. ज्यावेळी अंतरीम पोटगीची प्रमात्रा ठरविण्याचा विषय येतो त्यावेळी अर्जदार, वि.प. हे ज्या ठिकाणी राहतात ते ठिकाण, त्यांचे जिवनमान, त्या ठिकाणी जिवनावश्यक वस्तुंची असलेली किंमत या बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. तसेच, अर्जदार हिला न्यायालयात हजर रहाणे व इतर बाबींसाठी पैशांची आवश्यकता आहे. वि.प.क्र.१ याला रु.२०,०००/- निव्वळ प्रतिमाह पगार मिळतो. अर्जदार हिने वि.प.यांच्या नांवे सि.स.नं. ११५३ मध्ये फ्लॅट असल्या संदर्भात संदर्भात अभिलेखावर कागदपत्रे दाखल केलेली आहेत परंतु सदर मिळकत ही वि.प.क्र. १ चे वडिलांचे नांवे नमुद असल्याचे दिसून येते. तसेच वि.प.क्र.१ याने रक्कम रुपये दोन लाख इतके हातउसने घेतलेले आहे व वि.प. क्र. १ याचेवर त्याचे आईवडिल अवलंबून आहेत त्यामुळे वि.प.क्र.१ याच्यावर त्यांची जबाबदारी असल्याचे दिसून येते. त्यामुळे वि.प.क्र.१ याला मिळणारे उत्पन्न आणि त्याच्यावर असलेली जबाबदारी या सर्वांचा विचार करता वि.प.क्र.१ याने अर्जदाराला अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रु.३,५००/- देणे योग्य ठरेल. सबब, मी पुढील आदेश पारीत करते -

## आ दे श

०१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

०२. वि.प.क्र. १ याला आदेशीत करण्यात येते की, त्याने अर्जदाराला अंतरिम आर्थिक सहाय्य म्हणून दरमहा रक्कम रुपये ३५००/– (रुपये तीन हजार पाचशेहे फक्त ) प्रस्तुतचा अर्ज दाखल झालेपासून ते मुळ अर्ज निकाली होईपर्यंत देणेचा आहे.

०३. सदर निकालाची प्रत अर्जदाराला विनामुल्य तात्काळ द्यावी.

Digitally signed by SONALI VIJAYKUMAR JANGAMSWAMI
Date: 2026.06.08 15:16:40 +0530

ठिकाण-पन्हाळा
दि. ०८.०६.२०२६.

एस.व्ही.जंगमस्वामी
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,पन्हाळा
जि.कोल्हापूर